**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

वर्ष २ रे | अंक २६ वा | बुधवार १२ जून २०२४ | पाने ४ | किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 26 | Date : 12/06/2024 blow Wednesday Page 4 Price 4

## मान्सून दोन ते तीन दिवसांत संपूर्ण महाराष्ट्र व्यापणार

**पुणे/दैनिक यशसिध्दि न्यूज**

सोमवारी रात्री उशिरापर्यंत मान्सूनने अर्धा महाराष्ट्र गाठला असल्याचे हवामान विभागाने सांगितले आहे. येत्या दोन ते तीन दिवसांत मान्सून संपूर्ण महाराष्ट्राला व्यापणार, असा अंदाज देखील हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, राज्यातील अनेक भागांत मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. राज्याच्या अनेक भागांत मुसळधार पावसाने हजेरी लावली आहे. राज्यात मान्सून सक्रिय झाला आहे. कोकणासह, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा या भागात विजांच्या कडकडाटासह मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक



ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे.रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला असून मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. मुंबई, पुणे, सोलापूर आणि इतर जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट देण्यात आला आहे.

दहा दिवसांमध्ये ४४.९ मिलीमीटर पाऊस नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांची (मान्सून) राज्यातील घोडदौड कायम राहिली. पुढील दोन दिवसांमध्ये राज्याच्या उर्वरित भागात मान्सून सलामी देईल, असा अंदाज हवामान खात्याने दिला आहे. राज्यात गेल्या दहा दिवसांमध्ये ४४.९ मिलीमीटर पाऊस पडला आहे. सरासरीच्या तुलनेत १२४ टक्के जास्त पाऊस पडल्याची माहितीही खात्यातर्फे देण्यात आली आहे. मान्सून सरासरी तारखांप्रमाणे १५ जूनपर्यंत संपूर्ण राज्य व्यापतो. यावर्षी आतापर्यंत अर्धा महाराष्ट्र व्यापला आहे. त्यामुळे पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये म्हणजे एक ते दोन दिवस आधीच राज्यात सर्वदूर मान्सून हजेरी लावेल, असा अंदाज आहे. यंदा मान्सूनचा प्रवास अधिक वेगाने होत असल्याचे चित्र आहे.

## राज्यातील कोणत्याही गावातून थेट पंढरपूर गाठता येणार

### आषाढी यात्रेसाठी एसटी पाच हजार विशेष बस सोडणार

**मुंबई /दैनिक यशसिध्दि न्यूज**

एकीकडे पावसाची दमदार सुरुवात झाल्याने बळीराजा सुखावला असून पेरणीच्या कामाची तयारी करत आहेत. पेरणीनंतर वारकरी, शेतकरी विठुरायाच्या जपनामात मग्न होणार आहेत. दुसरीकडे पंढरीच्या वाराची तयारीही प्रशासनाकडून सुरू झली आहे. आषाढी यात्रेनिमित्त विठू नामाचा जयघोष करीत श्री श्रेत्र पंढरपुरला जाणाऱ्या भाविक प्रवाशांसाठी एसटीने यात्राकाळात ५ हजार विशेष बस सोडण्याचे नियोजन केले आहे. विशेष म्हणजे यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा असे आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात आले आहे.

सालाबाद प्रमाणे श्री श्रेत्र पंढरपुर येथे आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी येतात. अनेक प्रवाशी स्वत:च्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखीं बरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे. ४० पेक्षा जास्त **। पान २ वर**

## खुर्च्या उधार घेण्याची मोदींवर वेळ : खर्गे

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

लोकसभा निवडणुकीत देशाने असे उत्तर दिले की, दुसऱ्यांच्या घरातील खुर्च्या उधार घेऊन आपले सत्तेचे घर सांभाळण्याची मोदी सरकारवर ह्व वेळ आली आहे. २०२२ पर्यंत प्रत्येक नागरिकाच्या डोक्यावर छत असेल, अशी गॅरंटी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १७ जुलै २०२० ला देशाला दिली होती. ही गॅरंटी पोकळ ठरली, अशी उपरोधिक स्वरूपाची टीका काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी ट्विटद्वारे केली. खर्गे यांनी पंतप्रधान मोदी यांच्यावर निशाणा साधताना पंतप्रधान मोदींनी मागची गॅरंटी पूर्ण केली नाही. आणि आता गाजावाजा करत आहेत, पण देश सत्य जाणून आहे, असा टोलाही लगावला. तीन कोटी घरांसाठी कुठलीही कालमर्यादा देण्यात आलेली नाही. कारण भाजपने गेल्या १० वर्षांत काँग्रेस-यूपीएच्या तुलनेत १.२ कोटी घरे कमी उभारली. **। पान २ वर**

## दुधनी येथे अवैध्य धंदे विरोधात रिपाइं आवाज उठविणा : झळकी

**अक्कलकोट/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे अवैध्य धंदे बिंदास राजरोसपणे चालु असून याला कोणाचे आशिर्वाद आहे.हे संपूर्ण दुधनी करांना दाखवत संपूर्णपणे दोन नंबरचे धंदे विरोधात आवाज उठवणार असल्याचे मत रिपब्लिकन पक्ष (आठवले गट) चे जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली आहे.



दुधनी येथे होणारे सर्व अवैध्य धंदे बंद करण्यासाठी मा.आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी काही दिवसांपूर्वी विधानसभेतील अधिवेशनात विषय उपस्थित करुन गृह मंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांना संपूर्णपणे बंद करण्याचे मागणी केली होती.ति काय बंद झाली नाही,काहींनी फक्त जागा बदलली.अवैध्य धंदे काय बंद झाली नाही.तरी दुधनी करांना आश्र्चर्य वाटत आहे की यांचे पाठीमागे कोण असेल? या सर्व गौडबंगाल चे फर्धाफास रिपाइं ने बाहेर काढून सुशिक्षित आणी सुसंस्कृतपणा गावात मांडला पाहिजे. असे वातावरण निर्माण करण्याचे आपले मानस असल्याचे मत श्री झळकी यांनी या प्रसंगी आमच्या प्रतिनिधीशी बोलतांना व्यक्त केली आहे.दुधनी व दुधनी रेल्वे स्टेशन जवळील आवारात राज रोषपणे अवैध्य धंदे सुरु असल्याने दुधनी तील लहान मुले व विध्यार्थी आहारी जाऊन बिघडवत आहे. यामुळे दुधनीतील सुसंस्कारीत महिला वर्ग नाराजी व्यक्त करीत आहे. तरी वरीष्ठ अधिकार्यांनी जातीने लक्ष घालून लवकरात लवकर बंद करण्यात यावे.अन्यता पोलिस वरिष्ठांना आणी गृहमंत्री, मुख्यमंत्री तथा केंद्रीय मंत्री डां.रामदासजी आठवले यांच्या निदर्शनात आणून संपूर्ण अवैध्य धंदे बंद होईल पर्यंत स्वस्त बसणार नाही. असेही श्री सैदप्पा झळकी यांनी म्हणाले.

## मान्सून पूर्व पावसाच्या हजेरीमुळे फलटण आज टँकरची संख्या झाली कमी प्रांत अधिकारी सचिन ढोले

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

मान्सूनपूर्व पावसाच्या हजेरीमुळे फलटणला टँकरची संख्या झाली कमी प्रांत अधिकारी सचिन ढोले यांची माहिती. सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यामध्ये गेल्या काही दिवसापूर्वी दुष्काळी परिस्थिती सर्वत्र होती या तालुक्यांमध्ये एकूण ४२ गावांना ३३ टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात होता व गेल्या चार दिवसापासून झालेला मान्सून पूर्व पावसामुळे टँकरची संख्या कमी झाली आहे



## सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे प्रश्न मार्गी लावणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

### सामाजिक न्याय मंत्रालयाच्या केंद्रीय राज्यमंत्री पदाचा सलग तिसऱ्यांदा पदभार स्विकारून रामदास आठवले यांनी रचला इतिहास

**मुंबई/ नवी दिल्ली :**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी आज सामाजिक न्याय राज्य मंत्रालयात राज्य मंत्री पदाचा पदभार स्विकारला.केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री म्हणुन सलग तिसऱ्यांदा पदभार स्विकारून ना.रामदास आठवले यांनी एक विक्रम केलेला आहे. इतिहास घडवला आहे.आज शासकीय भवन नवी दिल्ली येथील सामाजिक न्याय मंत्रालयात कॅबिनेट मंत्री विरेद्रकुमार यांची भेट घेऊन त्यांनाही मंत्री पद मिळाल्याबद्दल विरेद्रकुमार यांचे अभिनंदन केले.शास्त्री भवनच्या पहिल्या मजल्यावरील कार्यालयात ना.रामदास आठवले यांनी आज केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयाचे राज्य मंत्री म्हणुन आपला



पदभार स्विकारला.त्यांच्या सोबत त्यांच्या पत्नी सौ.सिमाताई आठवले व अनेक रिपब्लिकन कार्यकर्ते उपस्थित होते.

दलित, ओबीसी सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे सर्व प्रकारच्या शिष्यवृत्तीचे प्रश्र्न आपण लवकरच मार्गी लावणार आहेत असा निर्धार ना.रामदास आठवले यांनी आपला पदभार स्विकारताना व्यक्त केला. सामाजिक न्याय मंत्रालयाच्या अंर्तगत ज्येष्ठ नागरिक,तृतीय पंथीय, तसेच ओबीसी ,अनुसुचित **। पान २ वर**

## कन्नड अभिनेता दर्शनला हत्येप्रकरणी अटक; सहा दिवसांची पोलीस कोठडी

**दर्शन थुगुडेपा**

बंगळूरु पोलिसांनी मंगळवारी प्रसिद्ध कन्नड अभिनेता दर्शन थुगुडेपा (४७) याला हत्या प्रकरणात अटक केली. त्यानंतर त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.



त्यापूर्वी त्याची चौकशी करण्यात आली. ९ जून रोजी रेणुकास्वामी नामक व्यक्तीचा मृतदेह नाल्यात सापडला होता. त्याच्या हत्येच्या संशयात दर्शन आणि अन्य १२ जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतल्याची माहिती पोलीस सूत्रांनी दिली.दर्शनच्या एका साहाय्यकाच्या मालमत्तेत रेणुकास्वामीची कथित हत्या केल्यानंतर त्याचा मृतदेह कामाक्षिपल्य येथील नाल्यात फेकण्यात आल्याचा संशय **। पान २ वर**

## सत्ताधारी व प्रशासनाचे दुर्लक्ष,रुग्ण,विदयार्थी व शेतकऱ्यांचे हाल !

### एका शेतकऱ्यांनी खोदला रस्ता चार गावचा तुटला संपर्क

**अक्कलकोट : दैनिक यश सिध्दी न्युज**

अक्कलकोट भीमनगर ते इटगे,नागनहळ्ळी,कंटेहळी जकापुर या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका शेतकऱ्यांने मुख्य वहीवाटचा रस्ता खोदल्यामुळे चार गावचा संपर्क तुटला आहे.यामुळे ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली असुन गावकरी नक्की जायचे तरी कुठून असा प्रश्र्न येतील नागरिकांना पडला आहे.

यासंबंधी तहसीलदार यांना लेखी पत्र देऊन सुद्धा दखल घेतली नाही.याकडे ना राजकीय लोकांचे लक्ष ना प्रशासनाचे लोक मात्र वेंटिलिटवर आहे?



एकीकडे राज्य सरकार रस्त्यासाठी कोट्यावधीच्या निधीची घोषणा करते... तर या परिसरातील मुख्य वहिवाट असलेल्या रस्त्याकडे प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.रस्ता नसल्याने शेतकऱ्याचे शेतीमाल आडत दुकानाकडे कसे घेऊन जायचे असा प्रश्र्न पडला आहे.या परिसरातील रस्त्याचा प्रश्र्न अद्याप पूर्णपणे सुटलेला नसल्याने शेतकऱ्यांना या अडचणीचा सामना करावा लागतो आहे.शेतीमाल बाजारात पोहोचविण्याकरीता तसेच यंत्रसामग्री शेतीपर्यंत जाण्यासाठी बारमाही रस्त्याची गरज आहे. तशी दिसून येत नाही. अक्कलकोट ते कंटेहळ्ळीकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका व्यक्तीने रस्ता खोदकाम केल्यामुळे आश्रम शाळा,कॉलेज,प्राथमिक मराठी शाळा व लीड स्कूल'ला जाण्यासाठी रस्ता नसल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत आहे.

काही दिवसात शाळा सुरू होणार आहे. विद्यार्थी या शाळेकडे जाणार कसे असा प्रश्र्न पालकांना पडला आहे.रस्त्याचे खोदकाम केल्यामुळे शासकीय एसटी बस व खाजगी गाड्या सध्या बंद आहे.रस्ता बंद झाल्याने मागील काही दिवसापासून दहावीतील मुले तासासाठी देखील जाऊ शकले नाहीत.मुलांना तास बंद करण्याची वेळ आली आहे. याला जबाबदार कोण?असा संतप्त सवाल विद्यार्थी व पालक करीत आहे.या संदर्भात स्थानिक पातळीवर चर्चा करून पर्याय रस्ता करण्यात यावा अशी पालक व विद्यार्थ्यांची मागणी आहे.

काही दिवसापासून सातत्याने कोसळत असलेला मध्यम पाऊस आणि त्यात रस्ता नसल्याने चार,पाच गावचा संपर्क तुटलेला आहे.

यामुळे या गावातील नागरिकांना वादळी वाऱ्यासह पावसाळ्यात पायी चालत जाण्याची वेळ येत आहे.गरोदर महिला, आजारी रुग्ण व वयोवृद्ध नागरिकांना जीवघेणा संघर्ष करावा लागत आहे.गरोदर महिला असो की वृध्द किंवा कुणी आजारी पडलं तर मोठ संकट उद्भवणार आहे.अशावेळी एखादे दुर्घटना घटल्यास याला जबाबदार कोण?असाही प्रश्र्न उपस्थित होत आहे. शहराकडे जाण्यासाठी रस्ता नसल्याने गावकरी अद्धिग्न झाले आहे.

के.बी.एन माध्यमिक आश्रम शाळेत एकूण २३० विद्यार्थी शिकत आहे.निवासी शाळा असल्याने विद्यार्थी आजारी पडल्यास अक्कलकोट दवाखाना येथे घेऊन जाण्यास रस्त्या अभावी मोठा त्रास होत आहे.सध्या एसटीची सुविधा सुद्धा बंद आहे.तात्काळ रस्त्याची सुविधा उपलब्ध करून द्यावे.

**हेडमास्तर के.बि.एन**
**माध्यमिक आश्रमशाळा नागनळ्ळी,अक्कलकोट**

कंटेहळ्ळी ते अक्कलकोट रोड हा भीम नगर मधूनच मूळ रहिवास रस्ता होता.हा रस्ता गेले दहा-बारा वर्षांपासून बंद आहे.चालू वहिवाट हि नागनहळ्ळी रस्त्यावरून चालू असताना संबंधित त्या शेतकऱ्यांनी रस्ता खोदल्याने पाच सहा गावासह दोन शाळांचा अक्कलकोट शी संपर्क तुटलेला आहे.लोकांचे आरोग्य विद्यार्थ्यांचे शिक्षण,शेतीमाल इत्यादी रस्त्यामुळे संपर्क तुटले.सर्वांना अडचणीची सामना करण्याची वेळ आली आहे.प्रशासनाने पर्यायी रस्ता तात्काळ तयार करून द्यावा अन्यथा आमरण उपोषण करण्यात येईल. **सौ.दिव्या येडे- सरपंच कंटेहळ्ळी ता.अक्कलकोट**

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# संपादकीय

## जनतेचा निर्णय..

इथे बेबंद हुकूमशाही स्थापन करणे, हे संघ परिवाराचे ध्येय आहे. मात्र, ते या देशात यशस्वी होणार नाही, हे समोर मांडणारा निर्देश म्हणजे हा निकाल असल्याचेही आपण म्हणू शकतो. लोकसभेच्या महाराष्ट्रातील निकालाकडे बघताना संख्येच्या पलीकडे जाऊन गुणात्मक निष्कर्ष अभ्यासणे गरजेचे आहे. या निकालांचा धावता आढावा घेत असताना काही मुद्दे प्रकर्षाने तसेच आग्रहाने मांडावेसे वाटतात. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे धर्माच्या आधारे जनतेमध्ये फूट पाडण्याच्या आणि धार्मिक ध्रुवीकरण करण्याच्या नरेंद्र मोदी–अमित शहा यांच्या विचारांना जनतेने नाकारलेले आहे. जनतेने मतांच्या माध्यमातून त्याविरोधात दिलेली ही संतप्त प्रतिक्रिया आहे, असेही आपण म्हणू शकतो. त्यांनी निवडणूक प्रचारामध्येच नव्हे तर मागील दहा वर्षांच्या कार्यकाळामध्ये याच धर्मवादी मतांचा पाठपुरावा केला. निवडणूक प्रचारात तर त्यांचे हे विचार उसळी मारून बाहेर पडत होते. त्या सगळ्या चुकीच्या राजकारणावरील प्रतिक्रिया म्हणजे हा निकाल आहे. रिवाजाप्रमाणे यंदाही निवडणुकीपूर्वी आणि निवडणुकीनंतर संभाव्य निकाल जाहीर करण्यात आले. काही 'पंडितांनी' तावातावाने ते मांडले. मात्र, राहुल गांधी यांनी सांगितल्याप्रमाणे ती केवळ मोदी मीडियाने निर्माण केलेली वातावरणनिर्मिती होती. विविध यंत्रणांवर दबाव निर्माण करण्यासाठी वापरलेली ही नीती होती. मात्र, ताजा निकाल त्यातील बोगसपणाही दाखवून जातो. निकालांबाबत माध्यमांमध्ये इंडिया आघाडी आणि एनडीएसंदर्भात वेगवेगळी भाकिते वर्तवण्यात आली होती. मात्र, आता ती सगळी फोल ठरल्याचे चित्र समोर आहे. ही बाबही असे तर्क मांडणारे माध्यमकर्मी किती एकांगी भूमिका घेतात, हे दाखवून देणारी आहे. माध्यमकर्मी देखील किती प्रभावाखाली वा दडपणाखाली व्यक्त होतात, हेही आता स्पष्टपणे दिसून आले आहे. राज्यवार विचार करायचा तर उत्तर प्रदेशमध्ये भाजपसाठी प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. तेथील गुणोत्तर ६०- ४० असे आहे. ही स्थिती भाजपसाठी समाधानकारक नाही.कारण हेच प्रमाण आधी ८०-२० असे राहिले आहे. भाजपला त्या राज्यात ७२ जागा होत्या. त्या तुलनेत या राज्यात आता ३० जागा कमी झाल्या आहेत. या राज्यातच अतिभव्य असे राम मंदिर उभे राहिले. इथेच त्यांनी काशीविश्वेश्वर मंदिराच्या रूपाने आगामी दंगलींची तयारी करून ठेवली. मात्र, ताज्या निकालाच्या माध्यमातून तेथील जनतेने या धार्मिक राजकारणाला पूर्णपणे नाकारले आहे.

पान १ वरुन

### राज्यातील कोणत्याही गावातून ..

भाविक प्रवाशांची संख्या असल्यास त्यांना त्यांच्या गावापासून विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. अर्थात या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत. दरम्यान, मागील वर्षी एसटीने आषाढी यात्रे निमित्त ४२४५ विशेष बसेस सोडल्या होत्या. याव्दारे यात्रा काळामध्ये १८ लाख, ३० हजार, ९३४ भाविक प्रवाशांची सुखरूप ने-आन एसटीने केली होती.

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे, अशा फुकटया प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवून असणार आहेत.

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक प्रवासी आपल्या गावाकडे मार्गस्थ होतात अशा वेळी रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊन प्रवासाचा खोळंबा होतो यंदा स्थानिक पोलीस प्रशासनाच्या खांदयाला खांदा लावून ३६ पेक्षा जास्त वाहतूक नियंत्रक व सुरक्षा रक्षक वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काम करणार आहेत. त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी पोलीस प्रशासनाला एसटीची मदत होणार आहे.

पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक अशा विविध सोयी-सुविधा पुरविण्यात येणार असून जास्तीत जास्त भाविक-प्रवाशांनी, एसटीच्या सुरक्षित प्रवासी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन एसटी महामंडळ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### खुर्च्या उधार घेण्याची ..

काँग्रेसने ४.५ कोटी घरे बांधली होती. तर भाजप २०१४-२४ दरम्यान ३.३ कोटी घरेच बांधू शकली, असे खर्गे म्हणाले.

पंतप्रधान मोदींच्या आवास योजनेत ४९ लाख शहरी आवास आहेत. म्हणजेच ६० टक्के अधिक निधी जनतेने आपल्या कमाईतून भरला आहे. एका सरकारी अंदाजानुसार शहरातील एक घर सरासरी ६.५ लाखात बांधण्यात येते. त्यापैकी केंद्र सरकार फक्त १.५ लाख रुपये आर्थिक मदत देत आहे. यात ४० टक्के योगदान राज्ये आणि नगरपालिकांचेही असते. उरलेला बोजा हा जनतेच्या माथी मारला जातो. असे संसदीय समितीने म्हटले आहे, असे खर्गे म्हणाले.

# निफाड वैनतेय विद्यालयात हीरक महोत्सवी वर्ष उत्साहात साजरे

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये वैनतेय विद्यालयाच्या प्रांगणामध्ये दरवर्षी शेकडो अमृत कुंभ समाज जीवनासाठी उधळले जातात आणि ते संस्कार संपन्न होऊन मानवी जीवनाच्या कल्याणासाठी आपल्या कर्तुत्वाची कुपी खुली करतात असे गौरवोद्गार ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्र्वास देवकर यांनी निफाड वैनतेय विद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यालयाच्या प्रांगणात काढले



वैनतेय विद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ऍड. ल जी तथा आप्पासाहेब उगावकर. संस्थापक विश्र्वस्त न्या. रानडे .विद्या प्रसारक मंडळ तसेच ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्र्वास देवकर. मास कम्युनिकेशन विभाग प्रमुख आरो.विद्यापीठ सुरत, तसेच प्रमुख अतिथी डॉक्टर शोभा नेर्लीकर , नगराध्यक्षा डॉ .कविता धारराव, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे ,प्रवीण राठी ,सुदाम धारराव, यतिश राऊत, मंगला सोमवंशी . संस्थेचे कार्यकारी विश्र्वस्त वि.दा. व्यवहारे, सचिव रतन पाटील वडघुले हे उपस्थित होते यावेळी न्या.रानडे आणि सरस्वती मातेच्या तसेच न्या. रानडे विद्या प्रसारक संस्थेच्या दिवंगत विश्र्वस्तांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले,यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ विश्र्वास देवकर आपल्या मनोगतातून पुढे म्हणाले की पुढच्या पिढ्या घडविण्याचे काम करणारे वैनतेय विद्यालयाचे प्रांगण असून या देशाची लोकशाही जिवंत आहे, ती अमृता समान आहे, अशा लोकशाहीचं संचित ज्यांनी पेरण्याचे काम केले आहे, अशी कितीतरी मंडळी या निफाडच्या मातीमध्ये होऊन गेली. त्यांच्याविषयी कृतज्ञता भाव यावेळी त्यांनी व्यक्त केला न्या. रानडे नावाने सुरू झालेली आपली संस्था काळाच्या पडद्याआड जाऊनही आपल्यासाठी ते अमृततत्त्व ठरले आहेत, सज्जन शक्ती संघटित झाली पाहिजे हा मनोगताचा केंद्रबिंदू ठेवून ते बोलत होते. यावेळी डॉ. दरेकर यांनी विद्यालयाविषयी गौरवउद्गार काढले याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक न्या. रानडे,विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्र्वस्त वि.दा. व्यवहारे यांनी केले,

९ जून रोजी विद्यालय स्थापनेला ६० वर्षे पूर्ण होत असून विद्यालयाच्या वतीने सण २०२४/२५ हे वर्ष हीरक महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे याप्रसंगी सकाळी८ वाजता विद्यालयाच्या वतीने निफाड शहरातून विजयी शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये विविध राष्ट्रपुरुषांच्या भूमिका साकारलेले विद्यार्थी लेझीम पथक नागरिकांची लक्ष वेधून घेतले यावेळी हीरक महोत्सव समिती अध्यक्ष रतन पा.वडघुले तसेच संस्थेचे विश्र्वस्त कोषाध्यक्ष राजेंद्र राठी विश्र्वस्त व सदस्य ऍड. दिलीप वाघावकर, प्रभाकर कुयटे, विश्र्वास पा. कराड, बाळासाहेब सोनवणे ,गुलाब टकले, सुभाष खाटेकर, संदीप चकोर ,विश्र्वनाथ व्यवहारे ,किरण कापसे ,राजेश सोनी, मधुकर राऊत, नरेंद्र कांदे, मनीषा गुजराती, बाळासाहेब गुंजाळ, साहेबराव बर्डे, तसेच विद्यालयाचे प्राचार्य बी आर सोनवणे, मुख्याध्यापक नारायण शिरसाट, मुख्याध्यापिका पल्लवी सानप, प्रसन्ना कुलकर्णी, सुजाता तनपुरे, तसेच शिवाजीराजे ढेपले, मांगीलाल कापसे, विक्रम रंधवे, संपतराव डुंबरे, रमेश जाधव, रामदास व्यवहारे ,नंदकुमार वडघुले, डॉ. राठी ,दिलीप कापसे, संजय कुंदे ,सुहास सुरळीकर, तसेच माजी विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीनाक्षी पवार, श्रीमती कांचन सानप तर आभार रतन पा.वडघुले यांनी मांडले

# खरीप हंगामासाठी बियाणे, खतांची टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घ्यावी : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

राज्यात पावसाला सुरुवात झाली आहे. यंदा चांगला पाऊस होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला असून राज्यात १ ते ११ जून पर्यंत संपूर्ण जून महिन्याच्या सरासरीच्या ३६ टक्के पाऊस झाला आहे. त्यादृष्टीने कृषी विभागाने खरीप हंगामाचे नियोजन करावे. शेतकऱ्यांना बियाणे, खतांची टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घ्यावी. ज्या भागात टंचाईची स्थिती आहे तेथे टँकरद्वारे पाणी पुरवठा आणि चारा छावण्यांसाठी जिल्हा प्रशासनाने प्राधान्य द्यावे. आपत्तीकाळात सर्व विभागांनी समन्वयातून काम करून नागरिकांना वेळेवर मदत पोहोचेल यादृष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

टंचाईच्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचे टँकर भरण्यासाठी वीज पुरवठा उपलब्ध होत नसेल तर त्याठिकाणी जिल्हा विकास निधीतून सोलर पंप बसविण्यासाठी आणि पाणी साठवणुकीसाठी प्लास्टीक टाक्या घेण्याचे अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यातील पाण्याच्या उपलब्धतेबाबत सद्यस्थिती व पर्जन्यमानाबाबतचा आढावा बैठक मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अनिल पाटील, संजय बनसोडे, शंभूराज देसाई, धनंजय मुंडे, दादा भुसे, मुख्य सचिव डॉ. नितीन करीर आदी उपस्थित होते.

यंदा चांगला पाऊस पडणार असल्याचे सांगत मुख्यमंत्र्यांनी बळीराजाला खरीप हंगामासाठी शुभेच्छा दिल्या. पावसाळ्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी यंत्रणेने अधिक सज्ज रहावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

राज्यात गेल्या दहा दिवसात सरासरीच्या ३६ टक्के पाऊस झाला असून जेथे पुरेसा पाऊस आहे तेथे पेरणी करण्यासाठी शेतकऱ्यांना आवाहन करण्यात यावे. खरीपासाठी शेतकऱ्यांना बियाणे, खतांची टंचाई जाणवणार नाही याची दक्षता घ्यावी. बियाणांचा काळाबाजार आणि बोगस बियाणे विक्री रोखण्यासाठी कृषी विभागाने धडक कारवाई करावी. त्यासाठी भरारी पथकांची संख्या वाढवावी, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

पाणी टंचाई ज्या भागात जाणवते तेथे टँकर भरण्यासाठी सोलर पंप वापरण्याची परवानगी देतानाच हे पाणी विहिरीत न साठवता त्यासाठी प्लास्टीक टाक्या वापराव्यात जेणेकरून पिण्याचे स्वच्छ पाणी मिळेल. या टाक्यांना नळ बसविण्यात यावे जेणेकरून महिलांना पाणी भरण्यासाठी सुलभता येईल, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. वीजबिल थकीत असलेल्या पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा सुरळीत राहील याची खबरदारी घ्यावी. अशा योजनांचा वीज पुरवठा खंडीत करू नये, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

मदतीचा निधी जिल्ह्यांना वितरीत करण्यात आला आहे. त्याच्या वितरणाच्या प्रक्रियेला गती द्यावी. केवायसी अभावी निधी बँकेत पडून राहता कामा नये, असे सांगतानाच अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतीचे, घरांचे पंचनामे तातडीने करण्यात यावे. जेथे पुरेसा पाऊस झाला नाही तेथे टँकर, चारा डेपो सुरू ठेवावे. जिल्हा आणि तालुका प्रशासनाने फिल्डवर जाऊन कामांना गती देण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव इकबाल सिंह चहल, प्रधान सचिव विकास खारगे, ब्रिजेश सिंह, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधान सचिव सोनिया सेठी आदी अधिकारी उपस्थित होते. राज्यातील सर्व विभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

### सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे..

जाती यांचे विषय सामाजिक न्याय मंत्रालयाच्या अंर्तगत येतात. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या अनेक योजना आहेत.फॉरन स्कॉलरशिप ही महत्वाची शिष्यवृत्ती योजना आहे. त्याच बरोबर दलित मागासवर्गीयांमधुन उद्योजक निर्माण व्हावा यासाठी या उद्योजकांना पुरेसा निधी मिळवून देण्यासाठी व्हेंचर कॅपिटल ही स्किम सुधा केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयाने सुरु केली आहे.या सर्व स्किमच्या पूर्ततेकडे आपण लक्ष देऊन काम करणार आहोत.तसेच देशभरात सामाजिक न्याय मंत्रालयाच्या वतीने आश्रम शाळा,व्यसनमुक्ती केंद्र, ज्येष्ठ नागरिकांसाठीचे ओल्ड एज होम आदि योजना भारत सरकारने सुरु केल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे देशभरात करण्याला आपण प्राधान्य देणार असल्याचे ना. रामदास आठवले यांनी सांगितले. यावेळी हजारो चाहत्यांनी ना. रामदास आठवले यांना पुष्पगुच्छ देऊन हार्दिक अभिनंदन केले.सलग तिसऱ्यांदा सामाजिक न्याय मंत्रालयाचे राज्य मंत्री म्हणुन पदभार स्विकारणे हा एक विक्रम असल्याचे मत त्यांच्या चाहत्यांनी व्यक्त केले आहे.यासाठी ना. रामदास आठवले यांचे देशभरातुन अभिनंदन होत आहे.

### कन्नड अभिनेता दर्शनला..

पोलिसांना आहे. दरम्यान, नाल्यात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह सापडला असून त्याच्या अंगावर जखमा असल्याची माहिती पोलिसांना स्थानिकांकडून मिळाली होती. त्यानुसार घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केल्यानंतर पोलिसांनी मृतदेह विच्छेदनासाठी पाठवला. शवविच्छेदन अहवालात त्याची हत्या झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला.

# शिंदे सरकार बरखास्त करून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करा; काँग्रेसच्या शिष्टमंडळाची राज्यपालांकडे मागणी!

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

एकीकडे राज्यातील शेतकरी हे मोठ्या प्रमाणात आत्महत्या करत असून दुसरीकडे जनता दुष्काळात होरपळून निघत आहे. मात्र, तरीही शिंदे सरकारला यापरिस्थितीचं गांभीर्य नाही. त्यामुळे राज्यातील गंभीर परिस्थिती बघता शिंदे सरकार बरखास्त करून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू करावी, अशी मागणी काँग्रेसनं राज्यपालांकडे केली आहे.




काँग्रेसच्या शिष्टमंडळाने आज राजभवन येथे राज्यपाल रमेश बैस यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी यासंदर्भातील निवेदन राज्यपालांना सादर केले. या भेटीनंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी राज्यातील शिंदे सरकारवर जोरदार टीका केली. लोकसभा निडणुकीच्या काळात राज्यांत २६७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. अद्यापही आत्महत्यांचे सत्र सुरू आहे. महत्त्वाचे म्हणजे 'डीबीटी'च्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिली जाणारी खते, बियाणे, औषधे अद्यापही देण्यात आली नाहीत. मात्र, शिंदे सरकार याकडे लक्ष्य द्यायला तयार नाही. त्यांना या परिस्थितीचं गांभीर्य नाही, अशी टीका नाना पटोले यांनी केली.

टेंडर न काढताच मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने अव्वाच्या सव्वा किंमत वाढवून कोट्यवधी रुपयांची खरेदी करण्यात आली याला विरोध करणाऱ्या कृषी आयुक्तांना बाजूला करण्यात आलं. राज्यात दुष्काळाची परिस्थिती असताना सरकार मंत्री सुट्टीवर गेले. मंत्र्यांना परदेशात जाण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागते. त्यामुळे या मंत्र्यांनी परदेशात जाण्याआधी कोणाची परवानगी घेतली होती, याचा खुलासा झाला पाहिजे, असे ते म्हणाले.

आज राज्यातील शेतकरी संकटात सापडला आहे. त्याला आता आधाराची गरज आहे. तसेच राज्यातील जनता दुष्काळात होरपळत आहे. ही दुष्काळाची परिस्थिती पाहता शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यायला हवी. तसेच जनावरांसाठी चारा छावण्या तसेच पिण्याच्या पाण्याचीही सोय करावी, अशी मागणीही नाना पटोले यांनी केली.छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले हे महाराष्ट्राचे दैवत आहेत. मात्र, या मोदी सरकारने संसद परिसरातून या महारपुरुषांची पुतळे काढले आहेत. त्याचा तीव्र शब्दात निषेध नोंदवला असून याबाबत राष्ट्रपती महोदयांना आमच्या भावना कळवा, अशी मागणी केल्याचंही नाना पटोले यांनी सांगितले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# जिवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना वाचा नक्कीच प्रेरणा मिळेल : डी.टी.गायकवाड

**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे:** विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये शिक्षणाचे खुप महत्त्व आहे शिक्षण हे आपल्या उज्वल भविष्यासाठी अत्यावश्यक असून शिक्षण यंत्राचा विद्यार्थांनी पुरेपूर उपयोग करावा शिवाय स्वतः ची एक वेगळी ओळख निर्माण करण्याचे खूप मोठे साधन या शिक्षणा मुळे सामाजिक आणि कौटोंबिक ही आदर ही वाढतो यासाठी शैक्षणिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी विद्यार्थ्याने आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आणि आपल्या जीवनात शिक्षणा विषयी प्रेरणा देणाऱ्या महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून शैक्षणिक दृष्ट्या सक्षम बनावे म्हणून जिवनात यशस्वी वाटचाल करण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर वाचा नक्कीच प्रेरणा मिळेल असे प्रतिपादन विद्रोही साहित्यिक डॉ डी टी गायकवाड यांनी केले .

नुकताच नळदुर्ग येथे जनसेवा बहुउदेशिय शिक्षण संस्था नळदुर्ग संचलित पैलवान रेवाप्पा सोनकांबळे क्रिडा प्रतिष्ठान नळदुर्ग पुणे यांच्या वतीने १० व १२ वी मध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा गुण गौरव सोहळा आयोजित केला होता त्या वेळेस ते कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून केले .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा राज सोनकांबळे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक प्रा डॉ गौतम गायकवाड , पोलीस उप निरीक्षक इश्र्वर नांगरे , नळदुर्ग आणि परिसरात साहित्यिक , एक उत्कृष्ठ निवेदक , पत्रकार , महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त भैरवनाथ कानडे , सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी वऱ्हाडे हे होते




.समाजातील वरिष्ठ मंडळीच्या मार्गदर्शनाने शिक्षीत बनतो शिक्षण देणारी सर्व मंडळी हे आपले शुभचितंक आसतात परंतू चांगल्या विचारांच्या पाऊल खुणा शिक्षणाच्या दिशेने घेऊन जातात त्या पाऊल खुणा विद्यार्थाने प्रामाणिक पणे स्विकाराव्या विचाराने विचार बदलतात , बदलाने बदलाव होते आणि तो बदल आम्हाला विद्यार्था मध्ये बघायचा आहे आसे परखड मत नळदुर्ग येथील पोलीस ठाण्याचे पोलीस उप निरीक्षक इश्र्वर नांगरे यांनी केले .यावेळी राज्यस्तरीय उत्कष्ठ पुरस्कार प्राप्त प्रा गौतम गायकवाड यांना संस्थेच्या वतीने पैलवान रेवाप्पा सोनकांबळे प्रतिष्ठान आयोजित समाज भुषण पुरस्कार व भारतीय संविधानाचा ग्रंथ सन्मान करण्यात आला . यावेळी सन्मानपत्राचे वाचन रि पा इं चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे यांनी केले .डॉ आंबेडकर इंटर नॅशनल इंग्लीश स्कूलचा १००% निकाल लागल्याने संस्थेचे १९ विद्यार्थी गुणवत्ता मिळविले आहे संस्थेचे संस्थापक मुख्य प्रवर्तक मारुती खारवे यांचे व त्यांच्या विद्यार्थांचे कौतुक व अभिनंदन केले आहे .सेवानिवृत मुख्याध्यापक कैलास गवळी , सेवानिवृत्त प्रा डॉ महादेव गायकवाड , सामाजिक कार्यकर्त्या कल्पनाताई गायकवाड यांनी आपपले मनोगत व्यक्त केले .ज्याना नुकताच पैलवान रेवाप्पा सोनकांबळे प्रतिष्ठानच्या वतीने समाज भुषण पुरस्कार जाहीर करण्यात आला ते सामाजिक कार्यकर्ते बंडु पुदाले , आर पी आय चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे , आर पी आय चे जिल्हा सचिव एस के गायकवाड , सा नळदुर्ग टाईम्स नळदुर्ग लाईव्ह चे मुख्य संपादक पत्रकार दादासाहेब बनसोडे , आदिजनांच्य उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला यावेळी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शालेय उपयोगी वस्तुचे वाटप करून बौद्ध संस्कारा साठी संस्कार विधिचे पुस्तक देऊन व डॉ डी टी गायकवाड व प्रा गौतम गायकवाड लिखीत पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचायत समिती उमरगा येथील सांखिकी विस्तार अधिकारी राहुल सोनकांबळे , सुधाकर सोनकांबळे , धर्मा सोनकांबळे , वैशाली माने पोलीस कॉन्स्टेबल सुधाकर माने बालीका सोनकांबळे , अदिनी परिश्रम घेतले .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर पी आय चे जिल्हा सचिव एस के गायकवाड यांनी केले तर शेवटी आभार कैलास गवळी यांनी मानले

# श्रीविठ्ठल मंदिर जतन संवर्धनाचे काम निकृष्ठ दर्जाचे? पहिल्याच पावसात लागली गळती : गणेश अंकुशराव

**पंढरपुर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

पहिल्याच पावसात पंढरपुरातील श्रीविठ्ठल मंदिराला गळती लागली असल्याने श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीमार्फत होत असलेले मंदिर जतन व संवर्धनाचे काम निकृष्ठ दर्जाचे होत आहे की काय? असा प्रश्न पडलाय. आम्ही सातत्याने या कामाच्या निकृष्ठ दर्जा बाबत आणि अधिकार्यांच्या हलगर्जीपणाबाबत आवाज उठवत आहोत, आणि या कामाकडे लक्ष ठेवण्यासाठी शासनाने स्वतंत्र अधिकार्यांची नियुक्ती करावी, तसेच पुरातत्व अधिकार्यांच्या देखरेखीखाली सर्व कामे व्हावीत अशी मागणी करत, होत असलेल्या कामाबाबत शंका उपस्थित केली होती. आज आमची शंका खरी ठरली असुन पंढरपुमध्ये काल झालेल्या पावसाचे पाणी मंदिराच्या छतावरुन थेट श्रीविठ्ठल रुक्मिणी मातेच्या गाभार्यात येत असुन गाभार्यासह सोळखांबी सभामंडपाच्या छताला गळती लागली असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसुन येत आहे. असे मत महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव यांनी व्यक्त केले आहे.श्रीविठ्ठल रुक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम करताना पुरातन कालीन मंदिरांचे काम करणारे कुशल कारागीरांकडुनच हे काम होणे अपेक्षित आहे, तसेच या कामाकडे सातत्याने लक्ष ठेवणारे, पुरातन कालीन मंदिराचा



अभ्यास असणारे वास्तुविषारद नेमणे आवश्यक आहे, परंतु तसे काहीच दिसून येत नाही. हे काम सुरु झाल्यापासुन सदर कामाची प्रथमपासुनच आम्ही पाहणी करत आहोत तेंव्हा आमच्या नजरेस कांही गोष्टी आल्या, त्या खटकल्या आणि याबाबत वारंवार आम्ही तक्रारीही केल्या परंतु याकडे मंदिरे समितीचे अधिकारी जाणुनबुजुन दुर्लक्ष करत आहेत. आत्ता पहिल्याच पावसात मंदिराला गळती लागल्याने हे काम निकृष्ठ दर्जाचे होत असल्याचा आमचा संशय बळावला असुन या कामाची सखोल चौकशी करण्यात यावी व या सर्व कामासाठी एखादा तज्ञ अधिकारी, पुरातत्व खात्याचे अधिकारी यांची काम पुर्ण होईपर्यंत नियुक्ती करावी, तसेच या कामासाठी शासनाकडून मिळालेला निधी, खर्च झालेला निधी व होऊ घातलेला खर्च याचा ताळेबंदही जाहीर करावा. अशी मागणी आम्ही करत आहोत. अशी माहितीही गणेश अंकुशराव यांनी दिली आहे.

गणेश अंकुशराव यांच्यासह पंढरपुरातील अनेकांकडुन सोशल मिडीयावर श्रीविठ्ठल मंदिरातील पावसाच्या पाण्याच्या गळतीबाबत चर्चा सुरु असुन जतन व संवर्धनाच्या कामाबाबत अनेकांकडुन शंका उपस्थित केली जात आहे. या कामाचा दर्जा तपासण्याची गरज सद्यस्थितीत तरी निर्माण झाली आहे.

# स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला 'ओबीई रँकिंग्ज २०२४ मध्ये उत्कृष्टतेचा सन्मान

## डायमंड बँड: इन्स्टिट्यूशन ऑफ प्रॉमिनन्स श्रेणीचे मानांकन

**पंढरपूर/दैनिक यशसिध्दि न्यूज**

गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला 'ओबीई रँकिंग्ज २०२४' मध्ये उत्कृष्टतेचा सन्मान प्राप्त झाला आहे. यामुळे स्वेरीला 'डायमंड बँड: इन्स्टिटयूशन ऑफ प्रॉमिनन्स' या श्रेणीचे मानांकन मिळाले आहे.

आऊटकम-बेस्ड एज्युकेशन (ओबीई) क्षेत्रात उत्कृष्टता साध्य केल्याबद्दल हा सन्मान स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला देण्यात आला आहे. सदरचे मानांकन हे 'आर वर्ल्ड इन्स्टिट्युशनल रँकिंग' यांच्याकडून प्रदान करण्यात आले आहे. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली 'पंढरपूर पॅटर्न'च्या माध्यमातून स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'शैक्षणिक क्रांती' होत आहे. या सन्मानामुळे स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या शैक्षणिक व व्यवस्थापकीय कार्यक्षमतेला एक नवी ओळख मिळाली आहे तसेच आऊटकम-बेस्ड एज्युकेशन साठी केलेल्या प्रयत्नांची पावती देखील मिळाली आहे. भारतात अनेक अभियांत्रिकी महाविद्यालये असताना केवळ तंत्रशिक्षणाचा निकष लावून स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला 'डायमंड बँड: इन्स्टिटयूशन ऑफ प्रॉमिनन्स' या श्रेणीत मानांकन प्रदान करण्यात आले आहे. गेल्या महिन्यामध्ये 'आर वर्ल्ड इन्स्टिट्युशनल रँकिंग' यांनी 'ओबीई रँकिंग्ज २०२४' साठी संपूर्ण देशभरातून प्रस्ताव मागवले होते. स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंगच्या विभागप्रमुख डॉ.मिनाक्षी पवार यांच्या नियोजनात्मक




मार्गदर्शनाखाली आय.क्यू.ए.सी.चे समन्वयक डॉ. संदीप वांगीकर यांच्या नेतृत्वाखाली ओबीई रँकिंग्जचे समन्वयक प्रा.दिगंबर काशीद यांच्या सहकार्याने या रँकिंग मध्ये सहभाग नोंदविला होता. या प्रस्तावामध्ये महाविद्यालयात असलेल्या आऊटकम-बेस्ड एज्युकेशन (ओबीई) अंतर्गत विविध उपक्रम, सोयी सुविधा, महाविद्यालयातील ओबीई करिता असणारे व्यवस्थापन आदी बाबींचा समावेश होता. स्वेरीकडून नेहमीच ओबीईला विशेष प्राधान्य दिले जाते. स्वेरीतील सर्व शैक्षणिक उपक्रमांचा परिपाक म्हणजे स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगला मिळालेले हे मानांकन होय. यापूर्वी स्वेरी अभियांत्रिकीला देशातील शैक्षणिक क्षेत्रात महत्वपूर्ण असलेले 'नॅक' अर्थात 'नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिल'चे ४ पैकी ३.४६ सीजीपीए सह 'ए प्लस' हे मानांकन मिळाले आहे. ए.आय.सी.टी.ई (ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन) व यु.जी.सी. (युनिव्हर्सिटी ग्रँटस कमिशन) यांच्याशी संलग्नित असणारे व ४ पैकी ३.४६ सीजीपीए सह नॅकचे 'ए प्लस' मानांकन मिळवणारे सोलापूर जिल्ह्यातील पहिले महाविद्यालय ठरले आहे. देशातील शैक्षणिक क्षेत्रातील महत्वपूर्ण असलेला 'स्वायत्त' अर्थात 'ऑटोनॉमस दर्जा' ही प्राप्त झाला आहे. हा दर्जा शै. वर्ष २०२४-२०२५ पासून शै. वर्ष २०३३-२०३४ अशा एकूण दहा वर्षांसाठी असणार आहे. महाविद्यालयातील पात्र अभ्यासक्रमांना 'एनबीए' चे तीनदा मानांकन मिळाले आहे तसेच शै. वर्ष २०२३-२४ मध्ये एन.आय.आर. एफ या राष्ट्रीय पातळीवरील रँकिंग मध्ये १५१- ३०० च्या बँड मध्ये स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने स्थान मिळवले आहे. ओबीई रँकिंग्ज २०२४' मध्ये 'डायमंड बँड: इन्स्टिटयूशन ऑफ प्रॉमिनन्स' हे मानांकन मिळाल्यामुळे स्वेरीमधून तंत्रशिक्षण पूर्ण करू इच्छिणारे विद्यार्थी आनंदित झाले आहेत. या यशाबद्दल स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख यांच्यासह सर्व विश्र्वस्त व पदाधिकारी, स्वेरी कॅम्पसचे इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी स्वेरीच्या 'आय.क्यू.ए.सी. टीम' चे अभिनंदन केले आहे.

# ज्ञानंम एव अमृतंम वैनतेय विद्यालयाने पाहिलेले स्वप्न : डॉ.दरेकर

## निफाड वैनतेय विद्यालयात हीरक महोत्सवी वर्ष उत्साहात साजरे

**निफाड/दैनिक यशसिध्दि न्यूज**

ज्ञानाच्या क्षेत्रामध्ये वैनतेय विद्यालयाच्या प्रांगणामध्ये दरवर्षी शेकडो अमृत कुंभ समाज जीवनासाठी उधळले जातात आणि ते संस्कार संपन्न होऊन मानवी जीवनाच्या कल्याणासाठी आपल्या कर्तुत्वाची कुपी खुली करतात असे गौरवोद्गार ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्र्वास देवकर यांनी निफाड वैनतेय विद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यालयाच्या प्रांगणात काढले

वैनतेय विद्यालयाच्या हीरक महोत्सवी वर्षानिमित्त विद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ॲड. ल जी तथा आप्पासाहेब उगावकर. संस्थापक विश्र्वस्त न्या. रानडे .विद्या प्रसारक मंडळ तसेच ज्येष्ठ पत्रकार डॉ. विश्र्वास देवकर. मास कम्युनिकेशन विभाग प्रमुख आरो.विद्यापीठ सुरत, तसेच प्रमुख अतिथी डॉक्टर शोभा नेर्लीकर , नगराध्यक्षा डॉ .कविता धारराव, उपनगराध्यक्ष अनिल पा. कुंदे ,प्रवीण राठी ,सुदाम धारराव, यतिश राऊत, मंगला सोमवंशी . संस्थेचे कार्यकारी विश्र्वस्त वि.दा. व्यवहारे, सचिव रतन पाटील वडघुले हे उपस्थित होते यावेळी न्या.रानडे आणि सरस्वती मातेच्या तसेच न्या. रानडे विद्या प्रसारक संस्थेच्या दिवंगत विश्र्वस्तांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले,

यावेळी ज्येष्ठ पत्रकार डॉ विश्र्वास देवकर आपल्या मनोगतातून पुढे म्हणाले की पुढच्या पिढ्या घडविण्याचे काम करणारे वैनतेय विद्यालयाचे प्रांगण असून या देशाची लोकशाही जिवंत आहे, ती



अमृता समान आहे, अशा लोकशाहीचं संचित ज्यांनी पेरण्याचे काम केले आहे, अशी कितीतरी मंडळी या निफाडच्या मातीमध्ये होऊन गेली. त्यांच्याविषयी कृतज्ञता भाव यावेळी त्यांनी व्यक्त केला न्या. रानडे नावाने सुरू झालेली आपली संस्था काळाच्या पडद्याआड जाऊनही आपल्यासाठी ते अमृततत्त्व ठरले आहेत, सज्जन शक्ती संघटित झाली पाहिजे हा मनोगताचा केंद्रबिंदू ठेवून ते बोलत होते. यावेळी डॉ. दरेकर यांनी विद्यालयाविषयी गौरवउद्गार काढले याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले .कार्यक्रमाचे प्रास्ताविक न्या. रानडे,विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्र्वस्त वि.दा. व्यवहारे यांनी केले,

९ जून रोजी विद्यालय स्थापनेला ६० वर्षे पूर्ण होत असून विद्यालयाच्या वतीने सण २०२४/२५ हे वर्ष हीरक महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे याप्रसंगी सकाळी८ वाजता विद्यालयाच्या वतीने निफाड शहरातून विजयी शोभायात्रा काढण्यात आली. यामध्ये विविध राष्ट्रपुरुषांच्या भूमिका साकारलेले विद्यार्थी लेझीम पथक नागरिकांची लक्ष वेधून घेतले यावेळी हीरक महोत्सव समिती अध्यक्ष रतन पा.वडघुले तसेच संस्थेचे विश्र्वस्त कोषाध्यक्ष राजेंद्र राठी विश्र्वस्त व सदस्य ॲड. दिलीप वाघावकर, प्रभाकर कुयटे, विश्र्वास पा. कराड, बाळासाहेब सोनवणे ,गुलाब टकले, सुभाष खाटेकर, संदीप चकोर ,विश्र्वनाथ व्यवहारे ,किरण कापसे ,राजेश सोनी, मधुकर राऊत, नरेंद्र कांदे, मनीषा गुजराती, बाळासाहेब गुंजाळ, साहेबराव बर्डे, तसेच विद्यालयाचे प्राचार्य बी आर सोनवणे, मुख्याध्यापक नारायण शिरसाट, मुख्याध्यापिका पल्लवी सानप, प्रसन्ना कुलकर्णी, सुजाता तनपुरे, तसेच शिवाजीराजे ढेपले, मांगीलाल कापसे, विक्रम रंधवे, संपतराव डुंबरे, रमेश जाधव, रामदास व्यवहारे ,नंदकुमार वडघुले, डॉ. राठी ,दिलीप कापसे, संजय कुंदे ,सुहास सुरळीकर, तसेच माजी विद्यार्थी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीनाक्षी पवार, श्रीमती कांचन सानप तर आभार रतन पा.वडघुले यांनी मांडले

# ४४९ सहायक निरीक्षकांना पोलीस निरीक्षकपदी बढती

सोलापूर/प्रतिनिधीः राज्यातील ४४९ सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षकपदी बढतीचा आदेश पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी दिला आहे. त्यामध्ये शहर आठ व ग्रामीण पोलीस दलातील दहा सहायक पोलीस निरीक्षकांचा समावेश आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील सहायक पोलीस निरीक्षक महेश भाविकट्टी यांची पुणे लोहमार्ग येथे, प्रमोद नलावडे व बाळासाहेब माने यांची गुन्हे अन्वेषण विभागात, विनायक देवकर यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र धुळे येथे, नितीन थेटे यांची मुंबई शहरात, स्वप्नील इज्जपवार यांची गडचिरोली येथे, बापू पिंगळे यांची मुंबई शहरात, भगवान नाईकवाडे यांची मुंबई शहरात, नारायण मिसाळ यांची मुंबई शहरात, बाबासाहेब काकडे यांची मुंबई शहरात पदोन्नतीवर बदली झाली आहे. तसेच सोलापूर शहर पोलीस दलातील सहायक पोलीस निरीक्षक रईसा शेख यांची येथील जात पडताळणी विभागात, इंद्रजित वर्धन यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र लातूर येथे, शारदा वालकोळी यांची लोहमार्ग मुंबई येथे, विनोद चव्हाण यांची गडचिरोली येथे, यशवंत बारवकर यांची मुंबई शहरात, सचिन बनसावडे यांची मुंबई हरात, रवींद्र मांजरे यांची मुंबई शहरात, सचिन बंडगर यांची मुंबई शहरात बदली झाली आहे.

